# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र:मविनिआ/माअअ/98/2018/ 001 दि.03.01.2019

**प्रति,**
श्री. माणिक दराडे,
बी/३०२, न्यु सिल्वर पार्क सहकारी गृह. संस्था (म.),
नभ मिलन पार्क कॉम्प्लेक्स, तिरूपती नगर फेज-२,
विरार (प.), ता. वसई, जिल्हा-पालघर,
पिनकोड ४०१३०३.

**विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. १४.१२.२०१८ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १८.१२.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून घेतलेल्या व मंजूर केलेल्या परवानानुसार व नियंत्रणात असलेल्या महाराष्ट्राच्या वीज वितरण करणाऱ्या कंपन्याकडून ग्राहकांस देण्यात येत असलेल्या वीज देयक हे कोणकोणत्या भाषेत देणे बंधनकारक व अनिवार्य आहे, त्या नियमांची व तरतूदीची माहिती व आयोगाकडून जारी करण्यात परिपत्रके, सुचना, आदेश व इ. नियमांची माहितीच्या प्रती व लेखी माहिती साक्षांकित करून द्यावी ही विनंती तसेच कंपन्याकडून सेवा घेण्यासंबंधीचे अर्ज, माहिती पुस्तके व सुचना फलक हे व माहिती सुचना फलक हे कोणकोणत्या भाषेत व प्रथम भाषा सर्व वरिल असलेल्यानुसार सर्वावर असणे अनिवार्य आहे, त्याची माहिती लेखी व प्रती द्याव्यात | आपणांस आवश्यक असलेली माहिती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ अन्वये नमूद केलेली आहे. सदर विनियमयातील मुद्दा क्रमांक ४.२ व १५.२ मध्ये उल्लेख केलेला आहे. सोबत प्रत जोडलेली आहे. (एकूण ३ पृष्ठे) तसेच सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in OR www.mercindia.org.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे. |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जर आपणांस सदर विनियमाची संपूर्ण छायांकित प्रत साक्षांकित करून हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| २९ | २ | ५८/- | अंदाजे रु. १००/- | १५८/- |
| | | | एकूण रु. | १५८/- |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम रू. ५८/- जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती साक्षांकित करून उपलब्ध करुन देण्यात येतील.

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी